Date: August 21, 2026

The BSE Limited
Phiroze Jeejeebhoy Towers
Dalal Street, Mumbai-400001
Scrip Code: 540203

The National Stock Exchange India Limited
Exchange Plaza, Bandra Kurla Complex
Bandra(E), Mumbai-400051
NSE Symbol: SFL

Dear Sir/Madam,

Sub: **Newspaper publication – Intimation regarding dispatch of Postal Ballot Notice and E-Voting Information**

Pursuant to Regulation 30 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we herewith enclose copies of the notice to the shareholders regarding dispatch of Postal Ballot Notice and E-voting information, published on August 21, 2026 in 'Financial Express' and 'Navakal'.

This is for your information and record.

Thanking you,

For Sheela Foam Limited

MD IQUEBAL AHMAD

Digitally signed by MD IQUEBAL AHMAD
Date: 2026.08.21 15:59:15 +05'30'

Md. Iquebal Ahmad
Company Secretary & Compliance Officer

तोडलेली १,७०० झाडे लावा! वनरक्षकांना कोर्टाचा आदेश

■ अहमदाबाद

पालिताणा वनक्षेत्रातील राजस्थळी बीटमध्ये १,६९० झाडे बेकायदा तोडल्याचा आरोप असलेल्या वनरक्षक करशन गोहिल आणि कल्पेश दाभी यांना न्यायालयाने जामीन दिला. मात्र, सुटकेनंतर १५ दिवसांच्या आत दोघांनी स्वतःच्या खर्चाने प्रत्येकी ८५० झाडे, म्हणजेच एकूण १,७०० झाडे लावावीत, असा आदेश न्यायालयाने दिला आहे. तसेच लावलेल्या रोपांची सलग तीन वर्षे देखभाल करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

या प्रकरणात जंगलाच्या संरक्षणाची जबाबदारी असलेल्या दोन्ही वनरक्षकांनी एका लाकूड कंत्राटदाराशी संगनमत करून २५ हजार रुपयांचा कथित मोबदला स्वीकारून १,६९० मोठ्या झाडे बेकायदा तोडण्यास मदत केल्याचा आरोप आहे. या वृक्षतोडीमुळे वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासाचे मोठे नुकसान झाल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी भारतीय वन कायदा आणि वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर वन विभागाने दोन्ही वनरक्षकांना निलंबित केले. जामिनासाठी केलेल्या अर्जात आरोपींच्या वकिलांनी तपास पूर्ण झाला असून आरोपपत्रही दाखल करण्यात आले. जप्त करण्यात आलेले साहित्य पोलिसांच्या ताब्यात असून आरोपी निलंबित असल्याने पुराव्यांमध्ये छेडछाड

होण्याची शक्यता कमी असल्याचा युक्तिवाद बचाव पक्षाने केला.

मात्र, सरकारने जामिनाला जोरदार विरोध केला. जंगलाचे संरक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या आरोपींनीच जंगलाचा नाश केल्याचा आरोप सरकारी वकिलांनी केला. अखेर उच्च न्यायालयाने दोन्ही आरोपींना २५ हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर नियमित जामीन मंजूर केला. मात्र, त्यासोबत झाडे लावण्याची आणि तीन वर्षे त्यांची देखभाल करण्याची कठोर अट घातली.

देश विदेश

भारतीय वंशाच्या पिया डांडिया प्रायमरी निवडणुकीत विजयी

■ फ्लोरिडा

भारतीय वंशाच्या अमेरिकन आणि शाळेच्या माजी मुख्याध्यापिका पिया डांडिया यांनी फ्लोरिडाच्या कांग्रेसनल डिस्ट्रिक्ट निवडणुकीसाठी डेमोक्रॅटिक पक्षाची प्रायमरी निवडणूक जिंकली. डांडिया यांना ६८.६ टक्के मते मिळाली. आता नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या मुख्य निवडणुकीत त्यांचा सामना रिपब्लिकन पक्षाच्या कॅसी असकर यांच्याशी होणार आहे. अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहात पोहोचण्यासाठी डांडिया यांच्या राजकीय प्रवासातील ही महत्त्वाची लढत ठरणार आहे.

विजयानंतर डांडिया यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे मतदारांचे आभार मानत म्हटले की, या अभियानावर विश्वास ठेवल्याबद्दल धन्यवाद. आपल्या विद्यार्थ्यांसाठी, मुलासाठी आणि या जिल्ह्यात वाढणाऱ्या प्रत्येक मुलासाठी निवडणूक लढवत आहे. खर्च कमी करणे, भ्रष्टाचार संपवणे हे माझ्या अभियानाचे प्रमुख मुद्दे आहेत. भारतामधून अमेरिकेत स्थलांतरित झालेल्या पालकांच्या कन्या असलेल्या डांडिया या पहिल्या पिढीतील अमेरिकन आहेत. हायस्कूलच्या मुख्याध्यापिका, धोरण क्षेत्रातील नेत्या आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यक्ती म्हणून त्यांनी काम केले आहे.

एआयमुळे तैवानच्या अर्थव्यवस्थेत तेजी प्रत्येक नागरिकाला ३० हजार देणार

■ तैपेई

एआय आणि सेमीकंडक्टर क्षेत्रातील वाढत्या मागणीमुळे तैवानच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळाली आहे. या आर्थिक वाढीचा थेट फायदा नागरिकांना देण्यासाठी सरकारने प्रत्येक नागरिकाला १० हजार तैवान डॉलर म्हणजेच सुमारे ३० हजार रुपये देण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

२०२७ च्या अर्थसंकल्पात या योजनेचा समावेश करण्यात आला असून, संसदेकडून मंजुरी मिळाल्यानंतर २०२७ मध्ये चिनी नववर्षापूर्वी नागरिकांना ही रक्कम मिळण्याची शक्यता आहे. तैवान हा सेमीकंडक्टर उत्पादनातील महत्त्वाचा देश आहे. त्यामुळे एआय, सेमीकंडक्टर, हाय-परफॉर्मन्स कॉम्प्युटिंग आणि क्लाउड सेवांची जगभरातील मागणी वाढल्याने तैवानच्या अर्थव्यवस्थेचा विकास यावर्षी अपेक्षेपेक्षा अधिक वेगाने होत आहे.

मध्य प्रदेशमध्ये रक्षाबंधनाला महिलांच्या खात्यात १,७५० रुपये

■ भोपाळ

मध्य प्रदेशातील लाडली बहना योजनेअंतर्गत महिलांना मिळणाऱ्या आर्थिक मदतीत वाढ करण्याची तयारी राज्य सरकारने केली आहे. सध्या दरमहा मिळणाऱ्या १,५०० रुपयांमध्ये २५० रुपयांची वाढ करण्यात येणार असून, रक्षाबंधनाच्या निमित्ताने मुख्यमंत्री मोहन यादव राज्यातील १.२५ कोटींहून अधिक महिलांच्या खात्यात १,७५० रुपये जमा करणार आहेत.

या माध्यमातून सरकारकडून लाडली बहनांच्या खात्यात एकूण २,१४८ कोटी रुपये हस्तांतरित केले जाणार आहेत. २५० रुपयांची अतिरिक्त मदत देण्यासाठी सरकारवर सुमारे ३१२ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. दिवाळीनंतर येणाऱ्या भाऊबीजेपासून लाडली बहना योजनेतील मासिक मदतीत आणखी २५० रुपयांची वाढ करण्याचा सरकारचा विचार असल्याची माहिती आहे. त्यामुळे आगामी काळात महिलांना मिळणारी मदत टप्प्याटप्प्याने वाढवण्याची सरकारची योजना असल्याचे सांगितले जात आहे.

'ॲनालॉग चीज'वर दीव दमणमध्ये वर्षभराची बंदी

दमण - अस्सल चीज किंवा पनीरच्या नावाखाली बनावट पनीर विकले जात असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर दादरा आणि नगर हवेली तसेच दमण आणि दीव प्रशासनाने केंद्रशासित प्रदेशात 'ॲनालॉग चीज' वर एक वर्षासाठी पूर्ण बंदी घातली आहे. आरोग्य सचिव तथा अन्न सुरक्षा आयुक्तांनी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, दुग्धजन्य नसलेल्या किंवा 'ॲनालॉग' चीजचे उत्पादन, प्रक्रिया, पॅकिंग, साठवणूक, वितरण तसेच घाऊक आणि किरकोळ विक्रीवर एक वर्षासाठी बंदी घालण्यात आली आहे. अन्न सुरक्षा विभागाने केलेल्या तपासणीत स्थानिक बाजारपेठांमध्ये दुग्धजन्य नसलेले पनीर पुरवले जात असल्याचे आढळून आले. हे

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

गंगा जल करारात पाण्याची हमी द्या! बांगलादेशची भारताकडे मागणी

■ ढाका

भारत आणि बांगलादेशदरम्यानचा गंगा जल करार डिसेंबर २०२६ मध्ये संपणार आहे. त्याआधी नव्या करारासाठी बांगलादेशने भारताकडे दुष्काळी काळात मिळणाऱ्या पाण्याची किमान प्रमाणात हमी देण्याची मागणी केली आहे. नव्या करारात 'हमी कलम' समाविष्ट करावे. गरज पडल्यास हा मुद्दा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर नेण्याचा इशाराही बांगलादेशने दिला आहे.

बांगलादेशचे जलसंपदा मंत्री शाहिदुद्दीन चौधरी एनी यांनी ढाका येथे कार्यक्रमात सांगितले की, सध्याच्या करारात दुष्काळी हंगामात गंगेच्या पाण्याचे वाटप कसे करायचे, याचे सूत्र आहे. मात्र, पाण्याचा प्रवाह खूपच कमी झाल्यास बांगलादेशला



किमान किती पाणी मिळेल, याची निश्चित हमी नाही. त्यामुळे नव्या करारात ही तरतूद स्पष्टपणे असावी. भारत आणि बांगलादेशदरम्यानचा सध्याचा गंगा जल करार १ जानेवारी ते ३१ मे या दुष्काळी कालावधीत लागू होतो. गंगेतील पाण्याच्या उपलब्धतेनुसार दोन्ही देशांमध्ये पाणी वाटप केले जाते.

गंगेतील पाण्याच्या प्रवाहानुसार भारत-बांगलादेशमध्ये पाणीवाटपाचे सूत्र ठरले आहे. मात्र, पाणी अत्यंत कमी झाल्यास बांगलादेशला किमान किती पाणी मिळेल, याची हमी सध्याच्या करारात नाही. त्यामुळे नव्या करारात 'हमी कलम' समाविष्ट करून किमान पाणीप्रवाहाची निश्चित हमी द्यावी, अशी बांगलादेशची मागणी आहे. १९७७च्या करारात अशी तरतूद होती; मात्र १९९६च्या करारात ती नव्हती.

अल्पवयीन चालकाने २ पादचारी महिलांना उडवले! एकीचा मृत्यू

■ नालासोपारा

अल्पवयीन मुलाने भरधाव वेगाने कार चालवत दोन पादचारी महिलांना धडक दिल्याची घटना नालासोपारा पूर्वेतील दत्तनगर येथे घडली. या अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला, तर दुसरी महिला गंभीर जखमी झाली आहे. या प्रकरणी तुळींज पोलिसांनी १६ वर्षीय अल्पवयीन चालकाला ताब्यात घेतले असून, वाहनमालकासह अन्य एका व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

नालासोपारा पूर्वेतील नगीनदास पाडा येथे राहणाऱ्या प्रगती मोरे (३६) आणि श्रेया मिसाळ (३२) या दोघी घरकाम करतात. काल त्या नेहमीप्रमाणे कामासाठी वसई येथे गेल्या होत्या. सायंकाळी साडेचारच्या सुमारास नालासोपारा रेल्वे स्थानकात उतरून त्या पायी घरी जात होत्या. त्या दत्तनगर परिसरातून जात असताना समोरून आलेल्या भरधाव राखाडी रंगाच्या इको कारने दोघींना जोरदार धडक दिली. या अपघातात दोघीही जखमी झाल्या. स्थानिकांनी त्यांना तातडीने नगीनदास पाडा येथील रकिया रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. श्रेया मिसाळ हिच्या डोक्याला, पाठीला, कमरेला आणि गुडघ्याला गंभीर दुखापत झाली होती. उपचार सुरू असताना रात्री पावणेदहा वाजताच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला.

मालवणी परिसरात घर कोसळून २ जखमी

मुंबई- मालाड पश्चिमेतील मालवणी परिसरात मालवणी येथील नवीन कलेक्टर कंपाऊंड परिसरात आज दुपारी १२ वाजताच्या सुमारास दोन मजली घर अचानक कोसळले. या दुर्घटनेत दोन जण जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलीस आणि संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी जाऊन मदतकार्य सुरू केले. मालवणीत अनधिकृत आणि धोकादायक बांधकामांवर कारवाई केली जात आहे.

पुणे महानगरपालिका, पुणे
विद्युत विभाग
मुदतवाढ

पुणे महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडील खाली नमूद केलेल्या निविदेस मुदतवाढ देण्यात यावी.

विक्री कालावधी दिनांक :- १२/०८/२०२६ ते २७/०८/२०२६ दुपारी २.३० पर्यंत
स्वीकृती दिनांक :- १२/०८/२०२६ ते २७/०८/२०२६ दुपारी २.३० पर्यंत
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : २८/०८/२०२६ दु. ३.०० वा.

अ. क्र.	खात्याचे नाव	कामाचे नाव	निविदा क्र.
१	विद्युत विभाग	पुणे महानगरपालिकेच्या वडगावशेरी येथील राजे छत्रपती शिवाजी महाराज उद्यानातील म्युझिकल फाउंटन दुरुस्ती तसेच पाच वर्ष ऑपरेटिंग व देखभाल दुरुस्ती करणे, (O&M)	PMC/ ELECTRICAL/ 2026 /173

१) वरील टेंडर्सची विक्री व स्वीकृती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून फक्त ऑनलाईन चालू आहे.
२) वरील बदला व्यतिरिक्त बाकी सर्व मजकूर पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणे राहील.

सही/-
कार्यकारी अभियंता (विद्युत)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/६१२ दि. २०/०८/२०२६

फॉर्म A
सार्वजनिक घोषणा
(दिवाळखोरी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियम, २०१६ च्या विनियम ६ अन्वये).

विक्स्पेस टेक्नॉलॉजीज एफ१ वर्क्स प्रायव्हेट लिमिटेड च्या कर्जदारांचे लक्ष वेधण्याकरिता

संबंधित तपशील

१.	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	विक्स्पेस टेक्नॉलॉजीज एफ१ वर्क्स प्रायव्हेट लिमिटेड
२.	कॉर्पोरेट कर्जदाराचा स्थापनेचा दिनांक	२७.०६.२०१८
३.	प्राधिकरण, ज्याअंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणी करण्यात आली	आरओसी मुंबई II
४.	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक	U74999MH2018PTC308136
५.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असेल तर) पत्ता	११०९, रूपा सॉलिटेअर, मिलेनियम बिझनेस सेक्टर १, महापे, ठाणे, नवी मुंबई, महाराष्ट्र, ४००७१०
६.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याचा दिनांक	१९.०८.२०२६
७.	दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेच्या परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक	१५.०२.२०२७
८.	इंटरिम रिझोल्यूशन प्रोफेशनल म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकांचे नाव आणि नोंदणी क्रमांक	एमव्हीके आयपीई एलएलपी Regn No: IBBI/IPE-0134/IPA-1/2022-23/ 50028
९.	मंडळाकडे नोंदणीकृत असल्याप्रमाणे, इंटरिम रिझोल्यूशन प्रोफेशनलचा पत्ता आणि ई-मेल	पत्ता: ऑफिस नं. ६०८ए, ६३/२ चेतक सेंटर, आरएनटी मार्ग, इंदूर (म. प्र.) ४५२००१ ई-मेल: mvk@mvkirp.com
१०.	इंटरिम रिझोल्यूशन प्रोफेशनलसोबत पत्रव्यवहारासाठी वापरण्याचा पत्ता आणि ई-मेल	पत्ता: ऑफिस नं. ६०८ए, ६३/२ चेतक सेंटर, आरएनटी मार्ग, इंदूर (म. प्र.) ४५२००१ ई-मेल: ip.quickspace1@gmail.com
११.	दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक	०२.०९.२०२६
१२.	इंटरिम रिझोल्यूशन प्रोफेशनलने निश्चित केलेल्या, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये कर्जदारांचे वर्ग, जर असेल तर.	मर्यादित माहितीच्या आधारे, आयआरपी, २०१६ च्या कलम २१(६अ) च्या खंड (ब) अन्वये कर्जदारांचा कोणताही वर्ग नाही.
१३.	वर्गामध्ये कर्जदारांचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे)	लागू नाही
१४.	(अ) संबंधित अर्ज आणि (ब) प्राधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल:	(अ) वेब लिंक: संबंधित अर्ज https://ibbi.gov.in//en/home/downloads येथून डाउनलोड करता येतील (ब) भौतिक पत्ता: उपलब्ध नाही

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल, मुंबई खंडपीठ, न्यायालय VI यांनी आदेश क्र. सी.पी. (आयबी)/१२३८ (एमबी) २०२५ नुसार दि. १९.०८.२०२६ रोजी विक्स्पेस टेक्नॉलॉजीज एफ१ वर्क्स प्रायव्हेट लिमिटेडची कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. विक्स्पेस टेक्नॉलॉजीज एफ१ वर्क्स प्रायव्हेट लिमिटेडच्या कर्जदारांना त्यांचे दावे पुराव्यासह दि. ०२.०९.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी आयटम क्र. १० समोर नमूद केलेल्या पत्त्यावर इंटरिम रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. वित्तीय कर्जदारांनी त्यांचे दावे पुराव्यासह केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे सादर करावे. इतर सर्व कर्जदार त्यांचे दावे पुराव्यासह प्रत्यक्ष, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे सादर करू शकतात. नोंद क्र. १२ समोर नमूद केल्यानुसार वर्गाशी संबंधित वित्तीय कर्जदारांनी, फॉर्म सीए मधील वर्गातील प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम पाहण्यासाठी नोंद क्र. १३ समोर नमूद तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून अधिकृत प्रतिनिधी म्हणून त्यांची पसंती सादर करावी. - लागू नाही

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.

सही/-
एमव्हीके आयपीई एलएलपी
[त्यांचे नामनिर्दिष्ट भागीदार श्री. मंगेश व्ही. केकरे यांच्यामार्फत]
इंटरिम रिझोल्यूशन प्रोफेशनल
विक्स्पेस टेक्नॉलॉजीज एफ१ वर्क्स प्रायव्हेट लिमिटेड
IBBI Regn. No. IBBI/IPE-0134/IPA-1/2022-23/ 50028
एएफए वैधता दि. ३१.१२.२०२६ पर्यंत

दिनांक: २१.०८.२०२६
स्थळ: इंदूर

फॉर्म ए
जाहीर घोषणा
(इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी बोर्ड ऑफ इंडिया (कॉर्पोरेट व्यक्तिंकरिता दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियम, २०१६ चे विनियम ६ अन्वये)

रिलायन्स एंटरटेनमेंट स्टुडिओज प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता

संबंधित तपशिल

१	कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	रिलायन्स एंटरटेनमेंट स्टुडिओज प्रायव्हेट लिमिटेड
२	कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेची तारीख	१६.०२.२०१९
३	ज्या प्राधिकरणा अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले आहे	कंपनी निबंधक, मुंबई
४	कॉर्पोरेट ऋणकोचे कॉर्पोरेट ओळख क्र./ मर्यादित दायित्व ओळख क्र.	U22300MH2019PTC321407
५	कॉर्पोरेट ऋणकोचे नोंदणीकृत कार्यालय व प्रधान कार्यालयाचा (काही असल्यास) पत्ता	नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट क्र. बी-०६, वालेचा चेंबर्स, ५वा मजला, न्यू लिंक रोड, इन्फिनिटी मॉल जवळ, अंधेरी पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४०००५३
६	कॉर्पोरेट ऋणकोच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याची तारीख	१९.०८.२०२६
७	दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया बंद होण्याची अंदाजित तारीख	१५.०२.२०२७
८	अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून कार्यरत दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक	उमेश बाळाराम सोनकर IBBI/IPA-001/IP-P-02619/2021-2022/14043
९	बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल	आयबीबीआय नोंद पत्ता: फ्लॅट क्र. १०, ओम शांती को-ऑप. हौसिंग सोसायटी, प्लॉट क्र. ८/१०/१२, सेक्टर ११, रोड क्र. ४, नवीन पनवेल, नवी मुंबई, महाराष्ट्र, ४१०२०६. आयबीबीआय नोंद. ईमेल: rosonkar1603@gmail.com
१०	अंतरिम ठराव व्यावसायिकाशी पत्रव्यवहार करण्यासाठी पत्ता आणि ई-मेल वापरला जाईल	प्रक्रियेचा विशिष्ट पत्ता: ऑफिस क्र. २०, ३रा मजला, १२६ बी, विठ्ठल हाउस, डिव्हाईन पार्ट, कालबादेवी रोड, मुंबई, महाराष्ट्र - ४००००२. प्रक्रियेचा विशिष्ट ईमेल: cirp.respl@gmail.com
११	दावा सादर करण्याची अंतिम तारीख	०२.०९.२०२६
१२	कलम २१ च्या उपकलम (६अ) च्या खंड (ब) अंतर्गत, अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केलेले धनकोचे वर्ग	लागू नाही
१३	वर्गात धनकोचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी ओळखले गेलेले दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे)	लागू नाही
१४	(अ) संबंधित फॉर्म आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत:	वेबलिंक: www.ibbi.gov.in वास्तविक पत्ता: बाब ९ प्रमाणे

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने **रिलायन्स एंटरटेनमेंट स्टुडिओज प्रायव्हेट लिमिटेड**च्या कॉर्पोरेट दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेला दि. १९.०८.२०२६ रोजी सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. **रिलायन्स एंटरटेनमेंट स्टुडिओज प्रायव्हेट लिमिटेड**च्या धनकोंना याद्वारे आवाहन करण्यात येते की त्यांनी त्यांचे दावे पुराव्यासह **०२.०९.२०२६** रोजी किंवा त्यापूर्वी बाब क्र. १० मध्ये नमूद करण्यात आलेल्या पत्त्यावर अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनलकडे सादर करावेत. वित्तीय धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच सादर करावेत. इतर सर्व धनको त्यांचे दावे पुराव्यासह व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.

दिनांक: २०.०८.२०२६
ठिकाण: मुंबई

सही/-
उमेश बाळाराम सोनकर
रिलायन्स एंटरटेनमेंट स्टुडिओ प्रायव्हेट लिमिटेडचे आयआरपी
आयबीबीआय नोंद. क्र. IBBI/IPA-001/IP-P-02619/2021-2022/14043
एएफए वैधता ३१.१२.२०२६ पर्यंत

शीला फोम लिमिटेड
(सीआयएन: L74899MH1971PLC427835)
नोंद. कार्यालय: १००२ ते १००६, दि ऑब्हेन्यू, इंटरनॅशनल एअरपोर्ट रोड, हॉटेल लीला सहार समोर, मरोळ नाका, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००५९.
कॉर्पोरेट कार्यालय: १४, सेक्टर-१३५, नोएडा-२०१३०१, उत्तर प्रदेश.
ईमेल: investorrelation@sheelafoam.com,
दूरध्वनी: +९१ १२० ४८६८१००, वेबसाईट: www.sheelafoam.com

टपाली मतदान/ई-मतदानाची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ ('कायदा') च्या कलम ११० आणि इतर सर्व लागू तरतुदी, तसेच कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० आणि २२ (त्यामध्ये वेळोवेळी लागू असलेले कोणतेही वैधानिक बदल किंवा पुनर्रचना यासह) ("नियम"), भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळ (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन, २०१५ (यापुढे "सेबी सूची विनियमन") चे विनियमन ४४, सर्वसाधारण एमसीए परिपत्रक, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाने जारी केलेले सर्वसाधारण सभांवरील सेक्रेटरियल स्टॅंडर्ड ("एसएस-२") आणि इतर कोणतेही लागू कायदे, नियम आणि विनियम (त्यामध्ये वेळोवेळी लागू असलेले कोणतेही वैधानिक बदल किंवा पुनर्रचना यासह) यांच्या तरतुदींनुसार, शीला फोम लिमिटेड (यापुढे "कंपनी") दि. ४ ऑगस्ट, २०२६ रोजीच्या पोस्टल बॅलट सूचनेत ("सूचना") नमूद केल्यानुसार, केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे (दूरस्थ ई-मतदान) मतदानाद्वारे, श्रीमती अवंतिका सिंग गौतम (डीआयएन: ०८३६८७९२) यांची कंपनीच्या गैर-कार्यकारी, अ-स्वतंत्र संचालक म्हणून नियुक्तीकरिता सदस्यांची मंजुरी मागत आहे. ठरावांशी संबंधित महत्त्वाची तथ्ये स्पष्ट करणारे स्पष्टीकरणात्मक विवरण हे सूचनेचा भाग आहे.

ही सूचना कंपनीच्या वेबसाईटवर (https://www.sheelafoam.com/), कंपनीचे निबंधक आणि हस्तांतरण एजंट असलेल्या एमयूएफजी इन्टाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या वेबसाइटवर (https://instavote.linkintime.co.in) आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com) व बीएसई लिमिटेड (www.bseindia.com) च्या वेबसाइटवर देखील उपलब्ध आहे.

सदस्यांना याद्वारे सूचित करण्यात येते की;

१. टपाली मतदानाची सूचना दि. २०.०८.२०२६ रोजी वितरित करण्यात आली आहे.

२. एनएसडीएलच्या परिपत्रकानुसार, कंपनी आपल्या सर्व सदस्यांना, ज्यांनी कंपनीकडे किंवा डिपॉझिटरी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे त्यांचे ईमेल पत्ते नोंदवले आहेत, त्यांनाच टपाली मतदानाची सूचना ("सूचना") केवळ ईमेलद्वारे पाठवत आहे.

३. मतदानाचा हक्क निश्चित करण्याकरिता आणि सूचना पाठवण्याकरिता अंतिम दिनांक शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट, २०२६ (कट-ऑफ दिनांक) आहे. ज्या सदस्यांची नावे कट-ऑफ दिनांकानुसार सदस्यांच्या नोंदवहीमध्ये किंवा डिपॉझिटरीजद्वारे असलेल्या लाभधारक मालकांच्या नोंदवहीमध्ये नोंदवलेली आहेत, केवळ तेच ई-मतदानाच्या सुविधेचा लाभ घेण्यास पात्र असतील.

४. ई-मतदानाकरिता सविस्तर कार्यपद्धती आणि सूचना, तसेच ज्या सदस्यांनी अद्याप त्यांचे ईमेल पत्ते नोंदवलेले नाहीत ते त्यांचे ईमेल पत्ते नोंदविण्याची आणि/किंवा मतदान करण्याची पद्धत, माहिती सूचनेमध्ये नमूद केली आहे.

५. दूरस्थ ई-मतदान दि. २१ ऑगस्ट, २०२६ रोजी स. ९:०० वाजता सुरू होईल.

६. दूरस्थ ई-मतदान दि. १९ सप्टेंबर, २०२६ रोजी सायं. ०५:०० वाजता समाप्त होईल.

७. ई-मतदान दि. १९ सप्टेंबर, २०२६ रोजी सायं. ०५:०० नंतर करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

८. टपाली मतदानाचे निकाल सोमवार, दि. २१ सप्टेंबर, २०२६ रोजी सायं. ०५:०० वाजता कंपनीच्या वेबसाइट (https://www.sheelafoam.com/), कंपनीचे निबंधक आणि हस्तांतरण एजंट असलेल्या एमयूएफजी इन्टाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या वेबसाइट https://instavote.linkintime.co.in आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com) व बीएसई लिमिटेड (www.bseindia.com) च्या वेबसाइटवर जाहीर केले जातील.

९. ई-मतदानाशी संबंधित कोणत्याही प्रश्नांकरिता सदस्यांनी enotices@linkintime.co.in वर ईमेल पाठवावा किंवा एमयूएफजी इन्टाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडशी संपर्क साधावा किंवा श्री. राजीव रंजन यांच्याशी दूरध्वनी: ०२२-४९१८६००० वर संपर्क साधा.

मंडळाच्या आदेशाद्वारे
सही/-
मोह. इकबाल अहमद
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी

ठिकाण: नोएडा
दिनांक: २० ऑगस्ट, २०२६

महावितरण

जाहीर निवेदन

महावितरण अंतर्गत कल्याण मंडळ -१ व २ मध्ये येणाऱ्या सर्व ग्राहकांना सूचित करण्यात येते की, दि. २१.०८.२०२६ रोजी सकाळी ०६.०० ते ११.०० वाजे पर्यंत महापारेषणची १०० केव्ही पडघा- मोहने लाइन, वडोदरा- मुंबई एक्सप्रेस वे येथे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, (NHAI) च्या कामासाठी बंद राहणार आहे. त्यामुळे महापारेषणचे १००/२२ केव्ही मोहने आणि अंबरनाथ अति उच्चदाब उपकेंद्र वरुन खाली नमूद केलेले २२ केव्ही लाइन बंद राहणार आहे.

अ. क्र.	अतिउच्चदाब उपकेंद्र	२२ केव्ही वाहिनीचे नाव	बंद राहण्याची वेळ	भागाचे नाव
१	१००/२२ केव्ही मोहने अति उच्चदाब उपकेंद्र	२२ केव्ही टिटवाळा	सकाळी ०६.०० ते ०९.००	टिटवाळा, मांडा, बल्याणी, अंबीवली रोड परिसर
		२२ केव्ही एम.आय.डी.सी. कॅम्प	सकाळी ०९.०० ते ११.००	शाहाड गावठाण, सी ब्लॉक रोड, शाहाड फाटक, धोबी घाट, साई वर्ल्ड
		२२ केव्ही सी ब्लॉक इनकमर फीडर	सकाळी ०९.०० ते ११.००	गोल मैदान, भीम नगर, मुकुंद नगर, ब्लॉक नं १३, साधू वासवणी टॉवर, ए ब्लॉक, डी एड कॉलेज
२		२२ केव्ही मोहने ४ इनकमर फीडर	सकाळी ०६.०० ते ११.००	गौरीपाडा, प्रेम ऑटो, शहाड, बंदरपाडा, योगीधाम, अनुपम नगर, घोलप नगर बिर्ला कॉलेज, इदिरा नगर, म्हाडा कॉलनी कोकण वसाहत, संदिप हॉटेल
३		२२ केव्ही मोहने १४ इनकमर फीडर	सकाळी ०६.०० ते ११.००	खडकपाडा, साई चौक, माधव संकल्प, बारावे गाव, टावरी पाडा KDMC पाणी पुरवठा पंप बारावे येथे
४		२२ केव्ही मोहने ११ इनकमर फीडर	सकाळी ०६.०० ते ११.००	चिकनघर, छत्री बंगला, छोटा म्हसोबा, छाया टॉकीज, रामबाग लेन नं ०,१,२,३,४,५,६, मुरार बाग, जोशी बाग, मुरबाड मेन रोड, सेंटर रेल्वे कॉलनी, रेल्वे हॉस्पीटल, रुख्मिनीबाई केडीएमसी हॉस्पीटल, कर्णिक रोड, पौर्णिमा चौक व परिसर
५		२२ केव्ही मोहने ७ अंबिवली	सकाळी ०९.०० ते ११.००	वडवली, अटाळी, अंबिवली, मांडा, नेपच्युन
६		२२ केव्ही मोहने ८	सकाळी ०६.०० ते ११.००	केडीएमसी अटाळी पंप
७		२२ केव्ही मोहने १२	सकाळी ०६.०० ते ०९.००	मोहने, यादवनगर, फुलेनगर, जेतवान नगर, गाळेगाव, तिपन्ना नगर
८	१००/२२ केव्ही अंबरनाथ अति उच्चदाब उपकेंद्र	२२ केव्ही कात्रप	सकाळी ०६.०० ते ०९.००	कात्रप गाव, चिखलोली गाव, जांभूळ, दत्त नगर, कात्रप, कात्रप पाडा
		२२ केव्ही खरवई	सकाळी ०६.०० ते ०९.००	खरवाई गाव, जुवेली गाव
		२२ केव्ही बदलापूर	सकाळी ०६.०० ते ०९.००	मानकवली फीडर , करवला, मानकवली गाव, भूशल
		२२ केव्ही मोहन सबरबीया इनकमर	सकाळी ०६.०० ते ०९.००	बापसई, गोवेली, मिरची वाडी, रायता नॉनो
		२२ केव्ही अंबरनाथ पूर्व	सकाळी ०९.०० ते ११.००	अंबरनाथ रेल्वे स्टेशन परिसर, कानसई गाव, मोहन पुरम, साई सेक्शन
		२२ केव्ही मोरीवली एम.आय.डी.सी.	सकाळी ०९.०० ते ११.००	चिंचपाडा, खोज गाव, नाना पाटील प्राईड,

अधिक्षक अभियंता
कल्याण मंडळ १